महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांकः तंशिविकापु/विवि/स्वनाथ-शिष्य/२०२२-२३/४६२३ दिनांक : ०३.१०.२०२२ 04 OCT 2022

**परिपत्रकः**

प्रति,
प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील,
**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली मान्यताप्राप्त**
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित
**पदविका/पदवी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या** संस्था.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या "स्वनाथ शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत प्राप्त अर्ज तपासणी करताना करावयाच्या कार्यवाहीबाबत..

संदर्भ : १) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक
जा.क्र. तंशिविकापु/विवि/एआयसीटीई-शिष्य/२०२२-२३/३९५९ दिनांक १८.०८.२०२२.
२) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र
जा.क्र. १८/तंशिसं/स्वनाथ-शिष्य/विकाप/२०२२-२३/२४८ दिनांक ३०.०९.२०२२.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका, पदवी) शिकणा-या **अनाथ किंवा ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोव्हिड-१९ मे मृत्यू पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा** विद्यार्थ्यांसाठी **"स्वनाथ शिष्यवृत्ती"** योजना सन २०२१-२२ पासून सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नोडल ऑफीस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर योजनेसाठी पात्र विद्यार्थ्याकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीचे अर्ज भरण्याबाबत संदर्भ क्रमांक १ मधील परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे.

**"स्वनाथ शिष्यवृत्ती योजना"** या योजनेच्या मार्गदर्शक तत्वे FAQ नुसार, **ज्या विद्यार्थ्यांच्या आई वडीलांचा किंवा दोघांपैकी एकाचा कोविड-१९ मुळे मृत्यू झाला आहे** अशा विद्यार्थ्यांच्या पालकांचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण - **कोविड-१९ मुळे मृत्यू** झाला आहे असे नमूद असणे आवश्यक आहे.

**"स्वनाथ शिष्यवृत्ती योजना"** अंतर्गत मागील वर्षी **(सन २०२१-२२)** विद्यार्थ्यांनी भरलेले, परंतु विद्यार्थ्याच्या पालकाच्या मृत्यू प्रमाणपत्रावर "मृत्यूचे कारण - **कोविड-१९ मुळे मृत्यू"** नमूद नसलेले अर्ज संस्थेकडून मंजूरी देऊन या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले होते. याबाबत आपल्याला संचालनालयाच्या दिनांक १७.१०.२०२२ पत्रान्वये यापूर्वीच खालीलप्रमाणे कळविण्यात आलेले होते.

१. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण - **कोविड-१९ मुळे मृत्यू** असे कारण नमूद असलेले मृत्यू प्रमाणपत्र अर्जासोबत **Upload** करावे. **किंवा**
२. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण **कोविड-१९ मुळे मृत्यू** असे नमूद नसेल तर त्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज करतेवेळी, मृत्यू प्रमाणपत्रासोबत **कोविड-१९ मुळे मृत्यू** नमूद असलेली रुग्णालयाची **Discharge Slip / Form No. 4 / Form No. 4A** अपलोड करावे.

वरील सूचना यापूर्वी देण्यात आलेल्या असून देखील, **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता, "स्वनाथ शिष्यवृत्ती योजना"** अंतर्गत काही विद्यार्थ्यांचे अर्ज पालकाच्या मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण - **कोविड-१९ मुळे** मृत्यू असे नमूद नसतानाही संस्थेकडून मंजूर करुन संचालनालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहेत. संचालनालयाकडून अर्ज तपासणी करतेवेळी असे अर्ज **"Defective"** मार्क करुन कारणासह परत पाठविण्यात येतात. जेणेकरुन विद्यार्थ्यांना त्रुटी दूर करुन परत जमा करता येईल.

सर्व संस्थांना पुनःश्च सूचित करण्यात येते की, **"स्वनाथ शिष्यवृत्ती योजना"** अंतर्गत अर्ज मंजूर करतेवेळी पालकाच्या मृत्यू प्रमाणपत्र संदर्भात दिलेल्या उपरोक्त सूचनांनुसार अर्ज तपासून पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावेत तसेच आपल्या संस्थेतील उपरोक्त योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज करतेवेळी, अर्जासोबत अपलोड करण्यात येणा-या पालकाच्या मृत्यू प्रमाणपत्र संदर्भात दिलेल्या उपरोक्त सूचनांनुसार मार्गदर्शन करावे, जेणेकरुन पात्र विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ घेता येईल.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे १६.

प्रत : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (कार्यासन क्रमांक १८)
२) प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरिता..